सदर बझार पोलीस स्टेशन, पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
दुरध्वनी क्रमांक 0217-2744641
email Id-
ps.sadarbazar.cpsol@mahapolice.gov.in

प्रेस नोट

दिनांक 24/02/2025

**चोरीचा दाखल गुन्हा सदर बझार पोलीस ठाणे गुन्हे प्रकटिकरण पथकाने 24 तासाचे आत उघडकिस आणून गुन्ह्यातील रोख रक्कम 1,50,000/- व 37 ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असे एकुण रुपये 4,46,000/- किमतीचा माल जप्त करुन गुन्ह्यातील 100 टक्के माल हस्तगत केला.**

---

सदर बझार पो.ठाणे गुन्हा रजिस्टर नं.149/2025 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम. 331(3),331(4),305 अन्वये घरफोडीचा गुन्हा दाखल होता. सदरचा गुन्हा दाखल झाल्यानंतर सदर बझार पोलीस ठाणे कडील गुन्हे प्रगटीकरण पथकातील अंमलदार **पोह/525 शहाजहाँन मुलाणी, पोह/548 संतोष पापडे, पोशि/1724 हणमंत पुजारी, पोशि/1119 उमेश चव्हाण**, यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सदर गुन्ह्याचे तपासात कोणत्या प्रकारचा पुरावा नसताना लेप्रसी कॉलनी, क्रिडासंकुलच्या मागे, सोलापूर येथे **दि.24/02/2025 रोजी 11.40 वा** एक इसम हातात पांढऱ्या रंगाची पिशवी घेवुन थांबलेला दिसला त्यांला संशयावरुन ताब्यात घेवुन सविस्तर चौकशी केली असता त्याने त्यांचे नाव **जिबरान ऊर्फ शोएब युन्नुस शेख वय.20 वर्षे रा.मौलाली चौक, केशव नगर, झो.पट्टी** असे असल्याचे सांगीतले त्याच्या ताब्यातील पांढऱ्या पिशवीमध्ये काय आहे ते पाहिले असता त्याच्याकडे रोख रक्कम व सोन्याचे दागीने मिळुन आले आहेत. चोरीस गेलेल्या मुददेमाल व त्याच्याकडे मिळालेले सोन्याचे दागीने व याबाबत पडताळणी केली असता त्यामध्ये साम्य मिळुन आले आहे. आरोपी नामे **जिबरान ऊर्फ शोएब युन्नुस शेख वय.20 वर्षे रा.मौलाली चौक, केशव नगर, झो.पट्टी यांने दि.23/02/2025 रोजीच्या दुपारी** 02.00 ते 03.00 दरम्याने मी मौलाली चौक, केशव नगर, येथे चोरी केल्याचे कबुल केले असुन **गुन्हे प्रगटीकरण प्रमुख पोउपनि नितीन शिंदे** यांनी गुन्हयाच्या तपासकामी **दि.24/02/2025 रोजी 12.20 वा** अटक केली आहे.

सदर आरोपीकडे गुन्हयामध्ये चोरीस गेलेला 100 % माल हस्तगत केलेला आहे. त्याची माहिती खालीलप्रमाणे

1 . **1,50,000/- रु रोख रक्कम त्यामध्ये 500 रुपये दराच्या 300 नोटा**
2 . **1,20,000/- रु सुमारे 15 ग्रॅम वजनाचे सोन्याचे गळयातील चैन**
3 . **80,000/- रु सुमारे 10 ग्रॅम वजनाचे सोन्याचे गळयातील चैन**
4 . **56,000/- रु सुमारे 7 ग्रॅम वजनाचे सोन्याचे अंगठी**
5 . **40,000/- रु सुमारे 5 ग्रॅम वजनाचे सोन्याची अंगठी**

-----------

**4,46,000/- एकुण**

सदरची कामगिरी मा.श्री. एम. राजकुमार, पोलीस आयुक्त, मा.विजय कबाडे, पोलीस उपआयुक्त परिमंडळ, मा.श्री. यशवंत गवारे मा.सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग-2, श्री. अजित लकडे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. भालचंद्र ढवळे पोलीस निरीक्षक (गुन्हे),यांचे मार्गदर्शनाखाली, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि नितीन शिंदे, सहा.फौ./ औदुंबर आटोळे, पोहेकॉ संतोष पापडे, पोहेकॉ/ शहाजहान मुलाणी, पोहेकॉ/सागर सरतापे, पोहेकॉ/ राजेश चव्हाण, पोकॉ/ सागर गुंड, अनमोल लट्टे, उमेश चव्हाण, हणमंत पुजारी, सोमनाथ सुरवसे, यांनी केली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
सदर बझार पोलीस स्टेशन सोलापूर शहर

